दैनिक
MAHILA SANVAD
# महिला संवाद

आवृत्ती : पुणे PRGI Reg. No. - MHMAR/25/A1224 इतर आवृत्ती : मुंबई - जालना- छत्रपती संभाजीनगर - सोलापूर - सातारा

संपादक : ज्योती मधुकर आडेकर | कार्यकारी संपादक : विद्या जाधव | उप संपादक : सौ. सुनंदा राजु निक्रड

**महिला प्रतिनिधी पाहिजेत**

जालना आणि पुणे येथून प्रकाशित होणारे महिला संवाद या मराठी वृत्तपत्रासाठी जिल्हा, तालुका आणि सर्कलसाठी महिला प्रतिनिधी पाहिजेत.

सामाजिक, शैक्षणिक, धामिर्क, राजकीय आणि भौगोलिक माहिती असणाऱ्यांनी खालील पत्तयावर संपर्क साधावा.

महिला संवाद

कार्यालय
दैनिक महिला संवाद,
गांधी चमन, सावित्रीबाई फुले चौक, जालना. 9168567111

PUNE : Volume No. 1, Issue No. 287, Marathi Daily Monday, Date - 25 May 2026 Price 2 Rupees, Pages - 4

पुणे अवृत्ती | वर्ष १ ले | अंक २८७ वा | मराठी दैनिक | सोमवार दि. २५ मे २०२६ | किंमत २ रुपये | पाने ४

# दुकानांसमोरील अतिक्रमण १५ दिवसात हटवा

## अन्यथा कारवाई; आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांचा इशारा

**पिंपरी । प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने पदपथावरील अतिक्रमण काढण्याची मोहीम हाती घेण्यात आली आहे. पदपथ हे नागरिकांना चालण्यासाठी असतात, त्यामुळे कोणत्याही पदपथावर अतिक्रमण करणाऱ्यांविरूद्ध महापालिकेच्या वतीने कठोर कारवाई केली जाईल. तसेच काही दुकानदार आपल्या दुकानापुढे अतिक्रमण करून साहित्य ठेवतात. त्यामुळे रहदारीला अडथळा निर्माण होऊन नागरिकांना नाहक त्रासाला सामोरे जावे लागत असल्याने अशा दुकानधारकांनी येत्या १५ दिवसांत असे अतिक्रमण कायमस्वरूपी हटवावे अन्यथा महापालिकेच्या वतीने कडक कारवाई करण्यात येईल, असा इशारा आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी दिला.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय भवनात आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी क्षेत्रीय कार्यालयनिहाय अतिक्रमण कारवाईच्या कामकाजाचा आढावा घेतला, त्यावेळी ते बोलत होते.

या बैठकीस अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम, तृप्ती सांडभोर, विक्रांत बगाडे, सह आयुक्त मनोज लोणकर, मुख्य अभियंता संजय कुलकर्णी, प्रमोद ओंभासे, सहशहर अभियंता बापूसाहेब गायकवाड, प्रेरणा सिनकर, मनोज सेठिया, मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी विजय बोरुडे, उप आयुक्त सचिन पवार, डॉ. प्रदीप ठेंगल, राजेश आगळे, व्यंकटेश दुर्वास, कार्यकारी अभियंता महेश बरीदे, विशेष अधिकारी किरण गायकवाड, मुख्य उद्यान अधिक्षक महेश गारगोटे यांच्यासह क्षेत्रीय अधिकारी निवेदिता घार्गे, राजाराम सरगर, अश्विनी गायकवाड, परशुराम वाघमोडे, अतुल पाटील, पुजा दुधनाळे, मुकेश कोळप आदी उपस्थित होते.

महापालिकेने सर्व क्षेत्रीय कार्यालयांअंतर्गत अतिक्रमणमुक्त पदपथ मोहीम हाती घेतली आहे.




नागरिकांना चालण्यासाठी विनाअडथळा पदपथ असावेत याकडे महापालिकेने लक्ष केंद्रित केले असून शहरातील पदपथ अतिक्रमणमुक्त केले जात आहेत. ही मोहीम राबविताना पुन्हा त्याच जागी अतिक्रमण होणार नाही याची दक्षता सर्व संबंधित अधिकारी, कर्मचाऱ्यांनी घेणे गरजेचे आहे. सर्व क्षेत्रीय कार्यालयनिहाय हॉकर्ससाठी जागा निश्चित करून त्याठिकाणी हॉकर्स झोन तयार करावा. शहरात बकालपणा वाढणार नाही, तसेच हॉकर्समुळे रहदारीला अडथळा निर्माण होणार नाही यासाठी सर्व क्षेत्रीय कार्यालयनिहाय फिरते पथक नेमून त्यावर सातत्याने देखरेख ठेवावी, असे निर्देश आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी दिले. काही दुकानदार जाणीवपुर्वक दुकानासमोरचे क्षेत्र वाढवून अनधिकृतपणे अतिक्रमण करतात. शिवाय दुकानासमोर साहित्य देखील ठेवतात, त्यामुळे रहदारीस अडथळा निर्माण होतो. अशा दुकानदारांनी येत्या १५ दिवसांमध्ये दुकानासमोरील अनधिकृत अतिक्रमण आणि साहित्य हटवावे अन्यथा संबंधित दुकानाचे अतिक्रमण निष्कासित करून दुकानदारावर कारवाई करण्यात येईल, असा इशारा देखील आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी दिला.

# नाशिक जेलमध्ये दारु पार्टीचा व्हिडिओ व्हायरल

**नाशिक । प्रतिनिधी**

नाशिकरोड मध्यवर्ती कारागृहातील सुरक्षा व्यवस्था आणि प्रशासकीय शिस्तीवर प्रश्नचिन्ह निर्माण करणारी एक धक्कादायक घटना समोर आली आहे. एका गंभीर फसवणुकीच्या गुन्ह्यातील संशयित आरोपीसोबत कारागृहाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दारू पार्टी केल्याचा व्हिडिओ सोशल मीडियावर तुफान व्हायरल झाला आहे. या प्रकारामुळे कारागृह प्रशासनात प्रचंड खळबळ उडाली असून, कर्तव्यात कसूर केल्याचा ठपका ठेवत ३ तुरंग अधिकाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे.

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, व्हायरल झालेला व्हिडिओ कारागृहाच्या अधिकारी निवासस्थानाच्या बाहेरील परिसरातील असल्याचा दावा केला जात आहे. या व्हिडिओमध्ये कारागृहाचे तीन जबाबदार अधिकारी एका संशयित




आरोपीसोबत पार्टी करताना दिसत असल्याची चर्चा रंगली आहे. हा व्हिडिओ समोर आल्यानंतर, गंभीर गुन्ह्यातील आरोपींशी कारागृह प्रशासनातील अधिकाऱ्यांचे असे लागेबंधे असण्यावर नागरिकांमधून तीव्र संताप आणि सुरक्षा व्यवस्थेबद्दल चिंता व्यक्त केली जात आहे. संबंधित अधिकारी आणि संशयित यांच्यातील आर्थिक किंवा इतर संबंधांबाबत आता दबक्या आवाजात चर्चा सुरू आहे.

या व्हायरल व्हिडिओ प्रकरणाची गंभीर दखल घेत मध्यवर्ती कारागृह प्रशासनाने वरिष्ठ पातळीवर तपास करून आपला प्राथमिक अहवाल वरिष्ठांना सादर केला आहे.

# ट्रॅक्टरच्या रोटरमध्ये अडकून तरुणाचा मृत्यू

**जळगाव । प्रतिनिधी**

शेतजमीन तयार करत असताना ट्रॅक्टरवरून अचानक तोल जाऊन पडल्याने, रोटरमध्ये सापडून ट्रॅक्टर चालकाचा जागीच मृत्यू झाल्याची अत्यंत धक्कादायक आणि काळीज पिळवटून टाकणारी घटना जळगाव जिल्ह्यातील यावल तालुक्यात समोर आली आहे. योगेश यशवंत पाटील (वय २८, रा. दहिगाव, ता. यावल) असे मृत पावलेल्या तरुणाचे नाव आहे. या दुर्दैवी घटनेमुळे यावल परिसरात प्रचंड खळबळ उडाली असून दहिगाव आणि मोहराळा गावांवर शोककळा पसरली आहे.

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, यावल तालुक्यातील मोहराळा गावाच्या शेतशिवारात शोभराज महाजन यांचे शेत आहे. या शेतात जमीन मशागतीचे काम करण्यासाठी दहिगाव येथील रहिवासी असलेला योगेश पाटील हा तरुण स्वतःच्या मालकीचे ट्रॅक्टर घेऊन गेला होता. शेतात रोटर फिरवून जमीन सपाटीकरण करत असताना, अचानक ट्रॅक्टरवर बसलेल्या योगेशचा स्वतःचा तोल गेला.

तोल गेल्याने तो थेट चालत्या ट्रॅक्टरवरून खाली कोसळला आणि मागे फिरत असलेल्या रोटरच्या तीक्ष्ण पात्यांमध्ये अडकला. रोटरचा वेग जास्त असल्याने गंभीर दुखापत होऊन योगेशचा जागीच मृत्यू झाला. हा भीषण प्रकार शेजारील शेतात काम करणाऱ्या शेतमजुरांच्या निदर्शनास आला. त्यांनी तात्काळ धाव घेत या घटनेची माहिती मृत योगेशच्या कुटुंबाला दिली.

घटनेची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांनी आणि नातेवाईकांनी शेतात धाव घेतली. योगेशला रोटरमधून बाहेर काढून




अत्यंत गंभीर अवस्थेत तात्काळ यावल येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, तेथील वैद्यकीय अधिकारी डॉ. गौरव भोईटे यांनी तपासणी करून योगेशला मृत घोषित केले. २८ वर्षीय तरुणाच्या अशा अपघाती निधनाने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

या भीषण अपघातप्रकरणी राजेंद्र पाटील यांनी दिलेल्या खबरीवरून यावल पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. घटनेची गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस निरीक्षक रंगनाथ धारबळे यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक फौजदार विजय पाचपोळे, हवालदार मोहन तायडे आणि राजेंद्र पवार पुढील तपास करीत आहेत.

# नाशिक जेलमध्ये दारु पार्टीचा व्हिडिओ व्हायरल; तीन तुरुंग अधिकाऱ्यांवर कारवाईची टांगती तलवार

**नाशिक । प्रतिनिधी**

नाशिकरोड मध्यवर्ती कारागृहातील सुरक्षा व्यवस्था आणि प्रशासकीय शिस्तीवर प्रश्नचिन्ह निर्माण करणारी एक धक्कादायक घटना समोर आली आहे. एका गंभीर फसवणुकीच्या गुन्ह्यातील संशयित आरोपीसोबत कारागृहाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दारू पार्टी केल्याचा व्हिडिओ सोशल मीडियावर तुफान व्हायरल झाला आहे. या प्रकारामुळे कारागृह प्रशासनात प्रचंड खळबळ उडाली असून, कर्तव्यात कसूर केल्याचा ठपका ठेवत ३ तुरंग अधिकाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे.

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, व्हायरल झालेला व्हिडिओ कारागृहाच्या अधिकारी निवासस्थानाच्या बाहेरील परिसरातील असल्याचा दावा केला जात आहे. या व्हिडिओमध्ये कारागृहाचे




तीन जबाबदार अधिकारी एका संशयित आरोपीसोबत पार्टी करताना दिसत असल्याची चर्चा रंगली आहे. हा व्हिडिओ समोर आल्यानंतर, गंभीर गुन्ह्यातील आरोपींशी कारागृह प्रशासनातील अधिकाऱ्यांचे असे लागेबंधे असण्यावर नागरिकांमधून तीव्र संताप आणि सुरक्षा व्यवस्थेबद्दल चिंता व्यक्त केली जात आहे. संबंधित अधिकारी आणि संशयित यांच्यातील आर्थिक किंवा इतर संबंधांबाबत आता दबक्या आवाजात चर्चा सुरू आहे. या व्हायरल व्हिडिओ प्रकरणाची गंभीर दखल घेत मध्यवर्ती कारागृह प्रशासनाने वरिष्ठ पातळीवर तपास करून आपला प्राथमिक अहवाल वरिष्ठांना सादर केला आहे. यामध्ये

१. हिरालाल भामरे (तुरंग अधिकारी) २. जगदीश ढुमणे (तुरंग अधिकारी) ३. अशोक मलवाड (तुरंग अधिकारी)

या तिन्ही अधिकाऱ्यांवर कर्तव्यात कसूर केल्याचा थेट ठपका ठेवण्यात आला आहे. हे तिन्ही अधिकारी २०१४ पासून नाशिकच्या मध्यवर्ती कारागृहात कार्यरत आहेत. प्रशासनाने या तिघांनाही नोटीस बजावून ७ दिवसांच्या आत लेखी खुलासा सादर करण्याचे कडक आदेश दिले आहेत.

ज्या व्यक्तीसोबत हे अधिकारी पार्टी करत होते, त्याचे नाव गौरव मिश्रा असे आहे. गौरव मिश्रा याच्यावर २०२४ मध्ये नाशिकच्या अंबड पोलीस ठाण्यात फसवणुकीचा गंभीर गुन्हा दाखल करण्यात आला होता.

# दोन महिलांना ट्रॅक्टरखाली चिरडण्याचा प्रयत्न

**नाशिक । प्रतिनिधी**

नाशिक जिल्ह्यातील पिंपळगाव बसवंतमध्ये धक्कादायक घटना घडली आहे. शेतीच्या वादातून दोन महिलांना ट्रॅक्टरखाली चिरडल्याची घटना घडली आहे. वादग्रस्त जमिनीवर नांगरणी सुरू असताना ही घटना घडल्याची माहिती मिळाली आहे. न्यायालयात प्रकरण प्रलंबित असताना शेतात दोन्ही बाजूंमध्ये वाद झाला. जाब विचारण्यासाठी गेलेल्या महिलांना ट्रॅक्टरची धडक बसल्याचा आरोप करण्यात येत आहे.

दरम्यान, मिळालेल्या माहितीनुसार, रश्मी अजय गोसावी आणि सुवर्णा सुभाष गोसावी या जखमी झाल्या आहेत. त्यांच्या खासगी रुग्णालयात उपचार सुरु आहेत. या घटनेचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. संबंधितांच्या विरोधात पिंपळगाव बसवंत पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेचा पुढील तपास सुरु करण्यात आला आहे.

नाशिक जिल्ह्यातील पिंपळगाव बसंत परिसरात भावबंदकीच्या जमीन वादातून



धक्कादायक घटना समोर आली आहे. न्यायालयाने स्थगिती दिलेल्या जमिनीवर जबरदस्तीने शेती नांगरण्याचा प्रयत्न करत महिलांसह कुटुंबीयांना ट्रॅक्टरखाली चिरडून जीवे मारण्याचा प्रयत्न झाल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. या घटनेत दोन महिला जखमी झाल्या असून त्यांच्यावर खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. दरम्यान, न्यायालयाचा आदेश असतानाही जबरदस्तीने जमिनीत प्रवेश केल्याचा आरोप होत असताना पोलिसांनी सौम्य गुन्हे दाखल केल्याचा आरोप नातेवाईकांकडून करण्यात येत आहे. या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून कठोर कारवाई करावी अशी मागणी करण्यात आली आहे.

# बीआरटी बसथांब्यावर तरुणीची छेडछाड; धाडसी युवतीमुळे आरोपी २४ तासांत जेरबंद

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे जिल्ह्याच्या पिंपरी-चिंचवडमधून महिलांच्या सुरक्षेचा ऐरणीवर आणणारी एक धक्कादायक घटना समोर आली आहे. चिंचवड येथील मदर तेरेसा उड्डाणपुलावरील एम्पायर इस्टेट बीआरटी बसथांब्यावर एका २४ वर्षीय तरुणीची अश्लील हावभाव करत छेडछाड करण्यात आली. मात्र, पीडित तरुणीने दाखवलेले धाडस आणि पिंपरी पोलिसांचा तांत्रिक तपास यामुळे या विकृत आरोपीला २४ तासांच्या आत बेड्या ठोकण्यात आल्या आहेत. जाकीर हमीद शेख असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे.

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, २२ मे रोजी सकाळी ७:४५ वाजण्याच्या सुमारास पीडित २४ वर्षीय तरुणी कंपनीच्या बसची वाट पाहत एम्पायर इस्टेट बीआरटी स्टँडवर उभी होती. सकाळी वर्दळीची वेळ असतानाही आरोपी जाकीर शेख तिथे आला आणि त्याने तरुणीला पाहून अश्लील चाळे व हावभाव करण्यास सुरुवात केली. अचानक घडलेल्या या प्रकाराने न घाबरता तरुणीने अत्यंत हुशारी आणि धाडस दाखवले. तिने स्वतःचा बचाव करण्यासाठी आणि पुरावा गोळा करण्यासाठी तात्काळ मोबाईल काढून आरोपीचे व्हिडिओ रेकॉर्डिंग सुरू केले. तरुणी मोबाईलमध्ये व्हिडिओ शूट करत असल्याचे पाहताच आरोपी जाकीर घाबरला. आपली ओळख लपवण्यासाठी त्याने अंगातील जॅकेट आणि डोक्यातील टोपी तिथेच रस्त्यावर फेकून दिली आणि घटनास्थळावरून पळ काढला.

घटनेची माहिती मिळताच पिंपरी पोलीस ठाण्याचे पथक तात्काळ क्शन मोडमध्ये आले. आरोपीचा माग



काढण्यासाठी पोलिसांनी परिसरातील १०० हून अधिक सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे फुटेज गोळा करून त्याची कसून तपासणी केली. तांत्रिक तपासाच्या आधारे पोलिसांनी आरोपीची ओळख पटवली. अखेर पिंपरी पोलिसांच्या पथकाने वाल्हेकरवाडी परिसरात सापळा रचून आरोपी जाकीर हमीद शेख याला ताब्यात घेतले. याप्रकरणी पिंपरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, आरोपीला अटक करण्यात आली आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पिंपरी पोलीस करत आहेत.

राजगड तालुक्यातील कोदवडी फाटा परिसरातील एका हॉटेलमध्ये झालेल्या वादातून फायरिंगची घटना घडली. या घटनेत दशरथ शिळीमकर आणि मस्कु दसवडकर हे दोघेजण जखमी झाले आहेत. त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या प्रकरणात ४ ते ५ आरोपी सहभागी असल्याची माहिती समोर आली आहे. त्यापैकी दोघांची ओळख पटली आहे. या प्रकरणातील सर्व आरोपी फरार असून पोलिसांनी जिल्हाभर नाकाबंदी करून शोधमोहीम सुरू केली आहे.

**पाहिजेत**

महाराष्ट्रातील निर्भिड आणि निष्पक्ष दैनिक महिला संवाद या वृत्तपत्रासाठी पुणे जिल्ह्यातील सर्व तालुक्यात प्रतिनिधी पाहिजेत इच्छुकांनी खालील प्रत्यावर अथवा क्रमांकावर संपर्क साधावा.

अनंत पार्क काळेवाडी रोड राहटणी धनगर बाबा मंदिरा जवळ पुणे शहर पुणे-४३१००३

संपर्क - 9168567111

वरील क्रमांकावर बायोडाटा पाठवावा

## थोडक्यात...

### ऊर्जा बचत व खर्च नियंत्रणासाठी उपाययोजना लागू

**पिंपरी । प्रतिनिधी**

पश्चिम आशियाई संकटाच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र शासनाने ऊर्जा बचत, इंधन वापर नियंत्रण, खर्च नियंत्रण तसेच कार्यपद्धतीमध्ये आवश्यक बदल करण्यासंदर्भात जारी केलेल्या निर्देशांच्या अनुषंगाने पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सर्व विभागांसाठी आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी महत्वाच्या सूचना जारी केल्या आहेत.

सामान्य प्रशासन विभागाच्या वतीने जारी करण्यात आलेल्या परिपत्रकानुसार महापालिकेतील अधिकारी व कर्मचाऱ्यांचे अभ्यास, प्रशिक्षण अथवा शासकीय कामकाजासाठी मंजूर असलेले परदेश दौरे पुढील आदेशापर्यंत स्थगित करण्यात येणार असून नवीन परदेश दौऱ्यांचे नियोजन टाळण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. बाह्यस्त्रोताव्दारे उपलब्ध करून दिल्या जाणाऱ्या वाहनांमध्ये शक्य त्या प्रमाणात इलेक्ट्रिक वाहनांचा वापर करण्यास प्राधान्य देण्यात येणार आहे. तसेच कार्यालयीन कामकाजासाठी नियोजित स्थळभेटी, पाहण्या व तपासणी दौरे यामध्ये कमीत कमी वाहनांचा वापर करून योग्य नियोजन करण्यावर भर देण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

अधिकारी व कर्मचाऱ्यांचे संयुक्त दौरे नियोजित करताना कारपूलिंग पद्धतीचा अवलंब करण्याच्या सूचना देण्यात आल्या असून इंधन बचतीसाठी सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा अधिकाधिक वापर करण्यावर भर देण्यात आला आहे. दौरे अपरिहार्य असल्यास मेट्रो, रेल्वे, पीएमपीएमएल बस अथवा इतर सार्वजनिक वाहतूक सुविधांचा प्राधान्याने वापर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. विभाग प्रमुख व वरिष्ठ अधिकाऱ्यांनी आठवड्यातील किमान एक दिवस सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा वापर करून सकारात्मक पुढाकार घ्यावा, असेही नमूद करण्यात आले आहे.

महापालिकेच्या अखत्यारीतील इलेक्ट्रिक वाहन चार्जिंग केंद्रांबाबत प्राप्त प्रस्ताव, परवानग्या व संबंधित प्रशासकीय कार्यवाही प्राधान्याने निकाली काढण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. चार्जिंग सुविधा अधिक सक्षम करण्यासाठी आवश्यक ती उपाययोजना करण्यावरही भर देण्यात आला आहे. तसेच महानगरपालिका स्तरावरील बैठका, प्रशिक्षण कार्यक्रम, चर्चासत्रे, आढावा बैठका व सेमिनार शक्यतो व्हिडीओ कॉन्फरन्सिंग अथवा ऑनलाइन प्रणालीद्वारे आयोजित करण्यात यावेत, असे निर्देश देण्यात आले आहेत. अंतर्गत बैठका, प्रशिक्षण व समन्वय सभा ऑनलाइन पद्धतीने घेण्यास प्राधान्य देऊन प्रवास व इतर अनुषंगिक खर्चात बचत करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

माहिती, प्रसिद्धी व जनजागृतीसाठी करण्यात येणाऱ्या जाहिराती, बॅनर्स, फ्लेक्स, सजावटीचे विद्युत दिवे व तत्सम खर्चिक बाबींचा वापर आवश्यकतेपुरताच मर्यादित ठेवण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. अनावश्यक खर्च टाळून काटकसरीचे धोरण राबविण्यावर भर देण्यात आला आहे. सर्व कार्यालयांमध्ये नैसर्गिक प्रकाशाचा जास्तीत जास्त वापर करावा तसेच कार्यालयीन वेळ संपल्यानंतर दिवे, पंखे, वातानुकूलन यंत्रणा, संगणक, उद्वाहन व इतर विद्युत उपकरणे बंद ठेवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

## संपादकीय...

### आयुक्तांचा कडक इशारा

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने शहरातील पदपथ अतिक्रमणमुक्त करण्यासाठी सुरू केलेली मोहीम ही केवळ प्रशासकीय कारवाई नसून, शहराच्या वाढत्या विस्कळीत व्यवस्थेवर दिलेला एक कठोर संदेश आहे. शहरातील पदपथ हे नागरिकांच्या सुरक्षित चालण्यासाठी असतात. मात्र, गेल्या काही वर्षांत अनेक ठिकाणी हे पदपथ फेरीवाले, दुकानदारांचे साहित्य, अनधिकृत बांधकामे आणि पार्किंगमुळे पूर्णपणे गायब झाले आहेत. परिणामी नागरिकांना रस्त्यावरून जीव धोक्यात घालून चालावे लागते. त्यामुळे महापालिकेची ही कारवाई योग्यच म्हणावी लागेल. पण या मोहिमेच्या निमित्ताने शहर नियोजनातील अनेक गंभीर प्रश्न पुन्हा एकदा समोर आले आहेत. पिंपरी-चिंचवड हे महाराष्ट्रातील वेगाने विकसित होणाऱ्या शहरांपैकी एक शहर आहे. उद्योग, आयटी, रोजगार आणि स्थलांतर यामुळे शहराचा विस्तार झपाट्याने वाढत आहे. परंतु, या वाढत्या शहरीकरणाच्या तुलनेत शहरातील मूलभूत सुविधा आणि नियोजन मात्र अनेक ठिकाणी अपुरे पडताना दिसते. रस्ते अरुंद, पार्किंगची समस्या, फेरीवाल्यांसाठी अपुरी जागा आणि पदपथांचे निकृष्ट नियोजन या सर्व कारणांमुळे अतिक्रमणाचा प्रश्न गंभीर बनला आहे. महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी स्पष्ट शब्दांत इशारा दिला आहे की, १५ दिवसांत अतिक्रमण हटवावे अन्यथा कठोर कारवाई केली जाईल. हा इशारा आवश्यक असला तरी केवळ कारवाई करून प्रश्न कायमचा सुटणार नाही, हेही वास्तव आहे. कारण अनेक फेरीवाले आणि छोटे व्यावसायिक हे केवळ नफ्यासाठी नव्हे तर उदरनिर्वाहासाठी पदपथांवर व्यवसाय करतात. शहरात स्थलांतरित होणाऱ्या हजारो कुटुंबांसाठी हा रोजगाराचा एकमेव मार्ग असतो. त्यामुळे प्रशासनाने कारवाईसोबत पर्यायी व्यवस्था निर्माण करणे हीसुद्धा तितकीच मोठी जबाबदारी आहे. विशेष म्हणजे, अनेक व्यापारी जाणीवपूर्वक दुकानासमोरील जागेवर अतिक्रमण करून आपला व्यवसाय वाढवतात. काही ठिकाणी तर पदपथावरच संपूर्ण माल मांडलेला दिसतो. यामुळे वाहतुकीला अडथळा निर्माण होतो, अपघातांचा धोका वाढतो आणि नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागतो. अशा व्यापाऱ्यांवर कठोर कारवाई होणे अत्यंत आवश्यक आहे. कारण सार्वजनिक जागेवर कोणाचाही खासगी हक्क असू शकत नाही. परंतु, याचवेळी महापालिकेच्या कार्यपद्धतीवरही प्रश्न उपस्थित होतात. शहरातील अनेक पदपथ स्वतः महापालिकेच्या निष्काळजीपणामुळे वापरण्यायोग्य राहिलेले नाहीत. अनेक ठिकाणी पदपथ तुटलेले आहेत, सांडपाण्याच्या झाकणांशिवाय गटारी उघड्या आहेत, तर काही भागात पदपथच पार्किंगमध्ये रूपांतरित झाले आहेत. मग अशा परिस्थितीत नागरिकांनी चालायचे कुठे? प्रशासनाने प्रथम स्वतःची जबाबदारी पार पाडणे आवश्यक आहे. महापालिकेने हॉकर्स झोन तयार करण्याचा निर्णय घेतला आहे, ही बाब सकारात्मक आहे. परंतु, यापूर्वीही अनेक वेळा अशा घोषणा झाल्या; प्रत्यक्षात मात्र बहुतांश हॉकर्स झोन निष्क्रिय राहिले. फेरीवाल्यांना व्यवसायासाठी योग्य जागा, स्वच्छता, पाणी, वीज आणि ग्राहकांची उपलब्धता नसेल, तर ते पुन्हा पदपथावरच येणार. त्यामुळे हॉकर्स धोरण हे फक्त कागदावर न राहता प्रभावीपणे अंमलात आले पाहिजे. शहरातील अतिक्रमणाचा प्रश्न हा केवळ कायदा आणि सुव्यवस्थेचा मुद्दा नाही, तर तो सामाजिक आणि आर्थिक वास्तवाशी जोडलेला आहे. बेरोजगारी, स्थलांतर आणि वाढती महागाई यामुळे हजारो लोक लहान-मोठे व्यवसाय करून जगत आहेत. त्यामुळे कारवाई करताना मानवी दृष्टिकोन ठेवणेही आवश्यक आहे. बुलडोझर चालवणे सोपे असते, पण पर्याय निर्माण करणे हे प्रशासनाचे खरे कौशल्य असते.

# उत्पादन आणि लॉजिस्टिक्सच्या क्षेत्रात मोठ्या प्रमाणात संधी - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**नागपूर । प्रतिनिधी**

सध्याची आंतरराष्ट्रीय परिस्थिती पाहता उत्पादन आणि लॉजिस्टिक्स क्षेत्रात अनेक मोठ्या संधी निर्माण होणार आहेत. मात्र, ज्या वेळी संधी उपलब्ध होतात, त्याच वेळी नवीन आव्हानेही समोर उभी राहतात. लॉजिस्टीक्सवर होणारा खर्च हेच सध्या उत्पादन क्षेत्रापुढील सर्वात मोठे आव्हान असून जागतिक पुरवठा साखळीचा प्रभावी भाग बनायचे असेल, तर आपल्याला जागतिक स्तरावर स्पर्धात्मक होणे अत्यावश्यक आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे केले.

गोदाम लॉजिस्टिक्स प्रायव्हेट लिमिटेडच्या वतीने गोंडखैरी येथे उभारण्यात आलेल्या गोदाम लॉजिस्टिक्स पार्कच्या उद्घाटन प्रसंगी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते. केंद्रीय रस्ते परिवहन आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्यासह आमदार डॉ. आशिष देशमुख, परिणय फुके, गोदाम लॉजिस्टिक्स प्रायव्हेट लिमिटेडचे संचालक महावीर जैन, के. के. गुप्ता, राजन अग्रवाल, जयप्रकाश गुप्ता, कृष्णकुमार गुप्ता, हल्दीरामचे शिवकिसन अग्रवाल आदी मान्यवर याप्रसंगी उपस्थित होते.



मुख्यमंत्री पुढे म्हणाले की, नागपूर व गडचिरोली भागातही आता उद्योग मोठ्या प्रमाणात आकर्षित होत आहेत. त्यामुळे लॉजिस्टीक्सच्या क्षेत्रात मोठ्या प्रमाणात संधी उपलब्ध होणार आहेत. सध्याची स्थिती पाहता आणखी कितीतरी प्रमाणात लॉजिस्टीक्सच्या व्यवस्थेत वाढ होण्यास वाव दिसत आहे. या क्षेत्रामुळे मोठ्या प्रमाणात रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार असून गोदाम लॉजिस्टिक्स पार्क हा नागपूरच्या आर्थिक विकासाच्या दृष्टीने मैलाचा दगड ठरेल, असा विश्वासही मुख्यमंत्री फडणवीस यांनी व्यक्त केला.

मालवाहतुकीत ईलेक्ट्रिक वाहनांचा मोठ्या प्रमाणात वापर झाल्यास इंधन खर्चाच्या बचतीसह पर्यावरणालाही मदत होईल आणि पर्यायाने लॉजिस्टिक्सवर होणारा खर्चही कमी करता येईल, असा विश्वास केंद्रीय रस्ते परिवहन व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी यावेळी बोलताना व्यक्त केला. संचालक महावीर जैन यांनी आपल्या प्रास्ताविकेत गोदाम लॉजिस्टिक्स पार्कबाबत माहिती दिली. राजन अग्रवाल यांनी आभार मानले.

दरम्यान, मध्य भारतातील सर्वात मोठ्या एकात्मिक औद्योगिक लॉजिस्टिक्स पार्कपैकी एक असा हा पार्क तब्बल २५ लाख चौरस फुटाच्या दर्जेदार 'वर्ग अ' गोदाम क्षमतेसह सुमारे १०५ एकर जागेत उभारण्यात आला आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेद्वारे संचालित स्मार्ट वेअर हाऊसिंगची अत्याधुनिक सुविधा या प्रकल्पात समाविष्ट आहे. या प्रकल्पाच्या माध्यमातून प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष रूपात सुमारे १५ हजार रोजगारांची निर्मिती होणार आहे. राष्ट्रीय महामार्ग क्र. ४४ आणि समृद्धी महामार्गाशी धोरणात्मकदृष्ट्या जोडण्यात आलेला असा हा महत्त्वाचा लॉजिस्टिक प्रकल्प आहे. या प्रकल्पात सुमारे सहाशे कोटी रुपयांची गुंतवणूक करण्यात आली असून प्रकल्पात सौर उर्जा संयंत्राचा समावेश करण्यात आला आहे.

# कॉँग्रेसचे ६० नगरसेवक 'नॉट रिचेबल'; वडेट्टीवारांचा भाजपवर पलटवार

**मुंबई । प्रतिनिधी**

आगामी विधान परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पूर्व विदर्भातून धक्कादायक बातमी समोर आली आहे. पूर्व विदर्भातील कॉँग्रेसचे काही नगरसेवक नॉट रिचेबल असून ते भाजपचे स्थानिक आमदार बंटी भांगडिया यांच्या संपर्कात असल्याची माहिती समोर आली आहे. चंद्रपूर, गडचिरोली येथील ६० हून अधिक नगरसेवक हे अज्ञातस्थळी गेल्याचे समजते. त्यामुळे कॉँग्रेसचे वरिष्ठ नेते विजय वडेट्टीवारांना हा धक्का मानला जात होता. यामुळे खळबळ माजलेली असतानाच दुसरीकडे विजय वडेट्टीवार यांच्या एका विधानामुळे अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत.

कॉँग्रेसचे ६० पेक्षा अधिक नगरसेवक गायब असल्याची चर्चा असतानाच, वडेट्टीवारांनी एक मोठा गौप्यस्फोट केला आहे. आमच्याही संपर्कात भाजपचे १०० पेक्षा जास्त नगरसेवक आहेत, त्यांच्यातही प्रचंड वाद आहेत, दुसरा गट आम्हाला मदत करायला तयार आहे असं मोठं विधान वडेट्टीवार यांनी केलं आहे. ते नगरसेवक कोण, कुठले, याविषयी मात्र वडेट्टीवार यांनी कोणतंही भाष्य केलेलं नाही. असं असलं तरीही त्यांच्या या विधानामुळे मोठी खळबळ माजली असून भारतीय जनता पक्षाच्या गोटात मात्र मोठा भूकंप होण्याची शक्यता आहे.

काँ ग्रेस पक्षाचा उमेदवार अजून ठरलेला नाही, आज तीन वाजता झूम मीटिंग आहे, महाविकास आघाडीत कोणती जागा कोणाला सोडायची यावर आज चर्चा करू. आमच्याही संपर्कात भाजपचे १०० पेक्षा जास्त नगरसेवक आहेत, त्यांच्यातही प्रचंड वाद आहेत, दुसरा गट आम्हाला मदत करायला तयार आहे पण आम्ही त्यात भानगडीत पडत नाही, असं ते म्हणाले. १५ लाख एका नगरसेवकाला दिल्यास निवडणुका होत असतील तर मला वाटतं लोकशाही भविष्यात शिल्लक राहील की नाही हा भविष्यात खरा प्रश्न आहे, असं विधानही वडेट्टीवार यांनी यावेळी केलं.



आमचा उमेदवार ठरलेला नव्हता म्हणून काही लोकांना टोकन म्हणून पाच पाच लाख रुपये दिल्याची माहिती आहे. ही शंभर कोटींची निवडणूक आहे. सिंदेवाही नगराध्यक्ष परत येईल त्यांच्यावर कारवाई होईल, जे जे नगरसेवक गेले, जे त्यांचा पक्षाच्या व्हीप झुगारून गेले त्यांच्यावर कारवाई होईल, व्हीप जरी करू योग्य कारवाई होईल, असा इशारा ही वडेट्टीवार यांनी दिला.

देशातील पेट्रोल-डिझेलच्या टंचाईवरूनही वडेट्टीवार यांनी सरकारवर ताशेरे ओढले. ही टंचाई कृत्रिम नाही. काल अमेरिकेने पुन्हा निर्णय लादला, भारताने ईरान आणि रशियाकडून तेल खरेदी करू नये असा फतवा अमेरिकेने काढलाय. त्यामुळे ही टंचाई कृत्रिम नाही, ही टंचाई निर्माण करण्यास सरकार जबाबदार आहे असा आरोप त्यांनी केला. सरकारच्या चुकीच्या धोरणामुळे डिझेल पेट्रोल मिळत नाही आणि दरवाढ होत आहे. ही पेट्रोल दरवाढ उद्या दीडशे रुपये वर जाईल, डीझेल १४० रुपये पर्यंत जाईल, पुढच्या महिन्याभरात ही परिस्थिती होईल असा गंभीर इशाराही त्यांनी दिला.

सध्या फक्त एका वेळेलाच मोठी दरवाढ न करतात, एक-एक, दोन-दोन रुपये दर हे दररोज वाढत आहे. ही फार गंभीर परिस्थिती आहे कोरोना पेक्षा विस्फोट, अधिक वाईट परिस्थिती देशात निर्माण होईल, देश उध्वस्त होईल, असा इशारा त्यांनी दिला. एपस्टिन फाईल आणि अदानीचं प्रकरण मुळे हा देश अमेरिकेच्या दावणीला बांधला गेलेला आहे, असे टीकास्त्र वडेट्टीवार यांनी सोडलं.

# विधानपरिषद निवडणुका उद्योगपतींच्या हातात जातील; वडेट्टीवारांची टीका

**मुंबई । प्रतिनिधी**

आगामी विधानपरिषद निवडणुकीत चंद्रपूर-गडचिरोली- वर्धा विधान परिषदेच्या जागेवरुन भाजप सुप्रिया सुळे यांचे व्याही अरुण लखानी यांना रिंगणात उतरवणार असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे. सुप्रिया सुळे यांनी रविवारी दिल्लीत जाऊन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतली होती.



यावेळी त्यांनी पंतप्रधान मोदी यांना आपल्या लेकीच्या लग्नाची निमंत्रणपत्रिका दिली. यावेळी सुप्रिया सुळे यांच्यासोबत मुलगी रेवती सुळे आणि जावई सारंग लखानी हे उपस्थित होते. त्यानंतर भाजपकडून विधानपरिषद निवडणुकीत अरुण लखानी यांना उमेदवारी मिळण्याच्या चर्चेने आणखीनच जोर धरला आहे. याबाबत सोमवारी काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी पत्रकार परिषदेत भाष्य केले.

अरुण लखानी असू देत किंवा कुठल्या दुसरे उद्योगपती असू देत, शेवटी ते उद्योगपतीच आहेत. आता तर त्यांचे संबंध मोठ्या राजकीय परिवाराशी जोडले गेले आहेत. अशा परिस्थितीत सामान्य माणसाला या निवडणुका आवाक्याबाहेरच्या आहेत. किमान आमच्यासारख्या तरी लोकांच्या आमच्या आवाक्याच्या बाहेरच्या दिसत आहेत, असे विजय वडेट्टीवार यांनी म्हटले.

अलीकडे विधानपरिषद निवडणुका म्हणजे उत्सव झाला आहे. आमच्या संपर्कातही भाजपचे १०० नगरसेवक आहेत. त्यांच्यातही अंतर्गत वाद आहेत. पण आम्ही या घोडेबाजारापासून आणि फोडाफोडीपासून लांब आहोत. विधानपरिषदेच्या प्रत्येक मतासाठी १५ लाखांचा रेट ठरला आहे. काही नगरसेवकांना पाच लाख रुपयांचे टोकन देऊन उचलण्याचे काम सुरु आहे. त्यामुळे निष्पक्ष निवडणुका होणे आणि योग्य माणसाची निवड होणे दूरच राहिले. अशा निवडणुकांमध्ये व्यापारी आणि उद्योगपती पैसे गुंतवतात. अशाने भविष्यात विधानपरिषद निवडणुका या कंत्राटदार आणि उद्योगपतींच्या हातात जातील. सामान्य माणूस भविष्यात विधानपरिषदेत दिसणार नाही. एका मतासाठी १५ लाखांचा रेट आहे. नगरसेवकांना इतके पैसे मिळाल्यानंतर त्यांना दिवाळी आहे वाटतं. या सगळ्यामुळे लोकशाही

शिल्लक राहील की नाही, हा प्रश्न पडतो, असे विजय वडेट्टीवार यांनी म्हटले. शिवानी वडेट्टीवार या चंद्रपूर-गडचिरोली- वर्धा विधान परिषदेच्या जागेवरुन निवडणूक लढवणार असल्याची चर्चा होती. मात्र, या निवडणुकीसाठी त्यांचे वय कमी पडत असल्याने त्यांनी या निवडणुकीतून माघार घेतल्याची चर्चा होती.

याबाबत बोलताना विजय वडेट्टीवार यांनी म्हटले की, अद्याप काही ठरलेलं नाही. जोपर्यंत वरिष्ठ पातळीवर निर्णय होत नाही तोपर्यंत मी काही निर्णय घेणार नाही. माघार घेतली असं मी आत्ता म्हणणार नाही,आम्ही सगळे चाचपणी करतोय, भाजपचा उमेदवार कोण होतो आणि काय खेळी आहे त्यावर आम्ही निर्णय घेऊ, असे वडेट्टीवार यांनी सांगितले.

# चित्रपट महामंडळाच्या निवडणुकीत राजकीय हस्तक्षेप?; सुषमा अंधारेंचा उदय सामंतांवर आरोप

**मुंबई । प्रतिनिधी**

दहा वर्षांनंतर होत असलेल्या अखिल भारतीय चित्रपट महामंडळाच्या निवडणुकीत सध्या हाय-व्होल्टेज ड्रामा पहायला मिळतोय.

नीलम शिर्के यांच्या उमेदवारीमुळे महामंडळात राजकीय शिरकाव झाल्याची चर्चा सुरू झाली आहे. महामंडळावर राजकीय वर्चस्व निर्माण करण्याचा प्रयत्न एका मंत्र्यांकडून होत आहे, असा आरोप अभिनेते विजय पाटकर यांनी केला होता. नीलम शिर्के अध्यक्षा होत असतील तर होऊ दे, पण माझा उमेदवारी अर्जसुद्धा भरू दिला नाही, अशी तक्रार त्यांनी केली. यात राजकीय हस्तक्षेप आहे पण तो उदय सामंत यांचा आहे का, हे मला माहीत नाही, असं वक्तव्य पाटकर यांनी केलं होतं. त्यानंतर आता शिवसेना ठाकरे गटाच्या





नेत्या सुषमा अंधारे यांनी थेट उदय सामंत यांच्यावर टीका केली आहे. पत्नीची निवड व्हावी यासाठी उदय सामंत यांची संपूर्ण सरकारी यंत्रणा कामाला लागली, असा थेट आरोप त्यांनी केला आहे.

'मराठी चित्रपट महामंडळाच्या निवडणुकीमध्ये नीलम उदय सामंत यांची निवड व्हावी यासाठी संपूर्ण सरकारी यंत्रणा कामाला लागली. विजय पाटकर यांच्यासारख्या अत्यंत ज्येष्ठ अभिनेत्यालासुद्धा अर्ज भरण्यापासून रोखण्यात आल्याची माहिती मिळते, जे अतिशय गंभीर आहे. नेते अभिनेत्यांसारखे वावरतात तिथपर्यंत ठीक आहे, पण नेते अभिनेत्यांच्या हक्काचे कलाक्षेत्रही बळकावत असतील तर मात्र दुर्दैवी आहे,' अशी पोस्ट अंधारे यांनी एक्स (ट्विटर) अकाऊंटवर लिहिली आहे.

एका मंत्र्यांचा ओएसडी मागच्या चार दिवसापासून कोल्हापुरात आहे आणि तो लोकांवर दबाव आणत आहे. त्यांच्या वतीने हा व्यक्ती नको तो व्यक्ती नको असं सांगितलं जात आहे. मोठा दबाव आणला जात आहे. मला कळत नाही त्या मंत्र्यांची आणि ओएसडी यांची विधानभवनातील सगळी कामं संपली आहेत का? जेणेकरून ते चित्रपट महामंडळात ठाण मांडून बसले आहेत. मागील ४० वर्षे आम्ही इंडस्ट्रीत आहोत.

आम्ही कधी राजकारण्यांकडे येतो का? त्यांनी कशाला इकडे यायला हवं, असा संतप्त सवाल पाटकर यांनी केला होता.

या निवडणुकीत मावळत्या संचालिका आणि ज्येष्ठ अभिनेत्री वर्षा उसगांवकर यांनी पुन्हा निवडणूक लढवण्याचं ठरवलं आहे, तर अभिनेत्री नीलम शिर्के यांनी त्यांना आव्हान दिलं आहे.

# मराठी न येणाऱ्या रिक्षाचालकांवर आरटीओचा दंडुका

**मुंबई । प्रतिनिधी**

मुंबईसह संपूर्ण राज्यातील रिक्षा आणि टॅक्सीचालकांसाठी मराठी भाषा सक्तीची करण्यात आली होती. जर रिक्षा चालकाला मराठी भाषा बोलता आली नाही तर एक मे पासून परवाने रद्द करणार अशी भूमिका सरकारने घेतली होती. यावरून वातावरण चांगलंच तापलं होतं. त्यानंतर रिक्षा चालकांना काही दिवस मराठी शिकण्यासाठी देण्यात आले.

आता यासंदर्भात प्रादेशिक परिवहन विभागाने (ठढज) कडक पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. रिक्षाचालकांना मराठी येते की नाही, याची प्रत्यक्ष खातरजमा करण्यासाठी आरटीओ अधिकारी आता थेट रस्त्यावर उतरले असून धडक तपासणी मोहीम हाती घेण्यात आली आहे.

समोर आलेल्या माहितीनुसार, प्रादेशिक परिवहन अधिकारी सध्या रस्त्यांवर थांबून प्रत्येक रिक्षाचालक आणि मालकाची कसून चौकशी करत आहेत. यावेळी अधिकाऱ्यांकडून केवळ रिक्षाचे कागदपत्रेच पाहिले जात नाहीत, तर चालकाचे ड्रायव्हिंग लायसन्स (परवाना) तपासून त्यांच्याशी थेट मराठीतून संवाद साधला जात आहे. चालकाला मराठी भाषा समजते आणि बोलता येते का, हे तपासण्यासाठी ही विशेष विचारपूस



केली जात आहे. या मोहिमेअंतर्गत रिक्षाचालक-मालकांची नोंदणी करण्याचे कामही वेगाने सुरू आहे.

या तपासणी मोहिमेसोबतच परिवहन विभागाने एक अत्यंत महत्त्वाची 'डेडलाईन' निश्चित केली आहे. प्रशासनाने १५ ऑगस्ट पर्यंतची मुदत दिली असून, त्यानंतर या कारवाईला अधिक वेग येणार आहे. १५ ऑगस्टनंतर जे रिक्षाचालक मराठी बोलू शकणार नाहीत किंवा ज्यांना मराठी भाषेचे ज्ञान नसेल, त्यांच्यावर मोठ्या प्रमाणावर आणि कठोर दंडात्मक कारवाई केली जाणार असल्याचा स्पष्ट इशारा देण्यात आला आहे.

अनेकदा रिक्षाचालक आणि प्रवासी यांच्यात भाषेच्या अडचणीमुळे गैरसमज किंवा वाद निर्माण होतात.

प्रवाशांशी संवाद साधताना भाषेची कोणतीही अडचण येऊ नये आणि परवाना देताना असलेल्या नियमांची (स्थानिक भाषेचे ज्ञान असणे) कडक अंमलबजावणी व्हावी, या उद्देशाने ही कारवाई सुरू करण्यात आली आहे. १५ ऑगस्टच्या या अल्टीमेटममुळे मराठी न बोलता येणाऱ्या रिक्षाचालकांचे धाबे दणाणले असून, आतापासूनच कारवाई सुरू झाल्याने परिवहन विभागाने या प्रकरणाची गंभीर दखल घेतल्याचे स्पष्ट झाले आहे.

